# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.03.2025** **वार:बुधवार**

1. लोकसभेत वित्त विधेयकाला मंजूरी तर राज्यसभेत आपत्ती व्यवस्थापन सुधारणा विधेयक आवाजी मतदानानं मंजूर
2. विधीमंडळात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा, शाळा महाविद्यालयांमध्ये अंमली पदार्थविरोधी क्लब तयार करण्यात येणार असल्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
3. दूध आणि दुग्धोत्पादनामध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी सध्याच्या कायद्यात सुधारणा करणार असल्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती आणि
4. खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत राज्याच्या खेळाडूंची मैदानी क्रीडा प्रकारात - उत्तम कामगिरी

**संसद**

वित्त विधेयक 2025 करदात्यांचा सन्मान जपणारं असून, व्यवसाय सुलभतेसाठी करसवलती प्रदान करणारं असल्याचं प्रतिपादन अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत केलं. वित्त विधेयक 2025 ला काल लोकसभेत मंजुरी देण्यात आली त्यावेळी चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री बोलत होत्या. येत्या पावसाळी अधिवेशनात नवीन प्राप्तीकर विधेयक चर्चेला आणलं जाईल अशी घोषणाही त्यांनी केली. नव्या करव्यवस्थेअंतर्गत 12 लाख रुपये उत्पन्न असलेल्या करदात्यांनाही शून्य कर भरावा लागणार असून करदात्यांना अभूतपूर्व करसवलत देणारं हे विधेयक असल्याचं सीतारामन यावेळी म्हणाल्या.

वित्त विधेयकाबरोबरच लोकसभेत काल बॉयलर विधेयक 2024 ला मंजुरी देण्यात आली. स्टीम बॉयलरच्या स्फोटांपासून जीवितहानी टाळणं तसंच मालमत्तेचं रक्षण करण्याची तरतूद या विधेयकामध्ये आहे. राज्यसभेत हे विधेयक आधीच मंजूर करण्यात आलं आहे. सर्व संबंधित घटकांशी चर्चा केल्यानंतर हे विधेयक संसदेत मांडण्यात आल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी सांगितलं. तत्पुर्वी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी मनरेगाशी संबंधित निधी न दिल्याच्या आरोपावरून विरोधी पक्षांनी लोकसभेत निदर्शनं केली.

राज्यसभेत काल राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला बळकटी देणारं आपत्ती व्यवस्थापन सुधारणा विधेयक 2024 ला मंजुरी मिळाली. राज्यसभेत आवाजी मतदानानं विधेयक मंजूर करण्यात आलं. लोकसभेनं आधीच मंजूर केलेल्या या विधेयकाला उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपत्ती व्यवस्थापन निधी वितरणात पारदर्शकता आहे असं सांगून कोणत्याही राज्यांबाबत भेदभाव केल्याचे आरोप फेटाळून लावले.

**गडकरी रस्ते अपघात**

देशातल्या रस्ते अपघातात 60 टक्क्यांहून अधिक मृत्यू 18 ते 45 वर्ष वयोगटातील लोकांमध्ये होत असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी यांनी म्हटलं आहे. अपघातांमुळे देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नाचं तीन टक्के नुकसान होत असल्याचंही गडकरी म्हणाले. दिल्लीत अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स आयोजित 'रस्ता सुरक्षेसाठी तंत्रज्ञान हस्तक्षेपअमेरिका-भारत भागीदारी' या चर्चेत ते बोलत होते. वाहतूक नियम आणि कायद्यांबद्दल विद्यार्थ्यांना जागरूक करण्यासाठी, शाळांनी अभ्यासक्रमात रस्ते सुरक्षा शिक्षण समाविष्ट करावं असं आवाहन गडकरी यांनी यावेळी केलं.

**विधीमंडळ**

विधीमंडळात काल दोन्ही सभागृहात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली. राज्यात हुक्का पार्लरचं वाढतं प्रस्थ रोखण्यासाठी यासंदर्भातल्या कायद्यात सुधारणा करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.

राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेबाबतच्या विरोधकांच्या आरोपांना फडणवीस यांनी उत्तर दिलं. शाळा महाविद्यालयांमध्ये अंमली पदार्थविरोधी क्लब तयार करण्यात येणार असल्याचं सांगून मुख्यमंत्री म्हणाले.......

***आमचा प्रयत्न आहे की पुढच्या काळामध्ये, शाळा कॉलेज मध्ये anti-narcotic club तयार करायचाय. की ज्याच्यामध्ये मुलंच पुढाकार घेतील. आणि त्या ठिकाणी वेगवेगळ्या एक्टिव्हिटी करतील आणि या क्लब च्या माध्यमातन इंटेलिजन्स देखील आम्ही जमा करू. या क्लबशी पोलीस संपर्कात राहतील. त्यामुळे त्यांची नावं न येता जर कोणी सेवन करत असेल तर त्याला कुठे मिळतंय? कॉलेज किंवा शाळेच्या आसपास अशा प्रकारचे ड्रग्स मिळतायेत का? अशा प्रकारची सगळी माहिती त्याच्या माध्यमातून मिळेल. आणि शिक्षण विभाग आणि जे विभाग शाळा चालवतात किंवा कॉलेज चालवतात. अशा सगळ्यांना याच्यामध्ये एकत्रितपणे इन्व्हॉल्व्ह करून विशेषतः शाळेचे आणि कॉलेजचे मुलं हे या मोहिमचा भाग होतील. अशा प्रकारची एक मोठी मोहीम आम्ही हातामध्ये घेतो आहोत.***

राज्यात शहरांमधल्या नद्यांच्या पूर पातळीसंदर्भातल्या निळ्या आणि लाल रेषांचं तातडीनं पुन्हा सर्वेक्षण करण्याचं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिलं. या रेषेत येणाऱ्या जमिनीवर अवैधरित्या विकासकामांची परवानगी दिली असेल तर ती रद्द करून संबंधितांवर कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

मुंबईच्या किनारा नियंत्रण तसंच ना विकास विभागात बेकायदेशीरपणे केलेल्या 267 बांधकामांविरोधात महापालिकेच्या वतीनं तातडीनं कारवाई करून ती पाडली जातील, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती अतिशय गंभीर असल्याचा आरोप विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला.

कोकणात रायगडमधल्या रेवसपासून सिंधुदुर्गातल्या रेडी पर्यंतच्या 523 किलोमीटरच्या सागरी महामार्गाचं नूतनीकरण करून हा मार्ग चौपदरी ग्रीनफिल्ड मार्ग करणार असल्याचं, मंत्री दादा भुसे यांनी एका तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. हे काम येत्या तीन वर्षांत पूर्ण करण्याचं नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

बोरगाव हुजुर ते मुक्ताईनगर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनामध्ये शेतकऱ्यांना सर्वाधिक मोबदला देण्याचा विचार असून, दोन एप्रिलच्या बैठकीत चर्चा करून अंतिम निर्णय घेऊ अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत दिली.

**राज्यघटना**

राज्यघटनेचं अधिष्ठान लाभल्यामुळे संसदीय लोकशाही अधिक भक्कम झाली आहे, असं प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केलं. भारताच्या राज्यघटनेची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल या विषयावर काल विधान परिषदेत चर्चा झाली त्यावेळी ते बोलत होते. राज्यघटनेच्या आधारे प्रगतीचा पल्ला आपल्याला गाठायचा आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, ही मूल्यं लोकशाहीत महत्त्वाची असून आपली लोकशाही ही जगासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**विधानसभा उपाध्यक्ष**

विधानसभेच्या उपाध्यक्षपदाच्या आज होणाऱ्या निवडणुकीसाठी महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आदींच्या उपस्थितीत अर्ज दाखल केला. बनसोडे यांचा एकट्याचा अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड होण्याची चिन्हं असून, त्याची अधिकृत घोषणा आज होण्याची शक्यता आहे.

**अजित पवार-दूध भेसळ**

दूध आणि दुग्धोत्पादनामध्ये होणाऱ्या भेसळीची बाब गंभीर असून, अशा प्रकारची भेसळ करणाऱ्यांवर मकोकाअंतर्गत कडक कारवाई करण्यासाठी सध्याच्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील असं- उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. या सुधारणांसंबंधीचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्याचे निर्देश त्यांनी काल दिले. दूध भेसळीसंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. दुधातील भेसळ तपासण्यासाठी प्रत्येक विभागात एक प्रयोगशाळा तातडीनं सुरू करावी, पनीरमध्ये ॲनालॉग चीज असल्यास त्यासंबंधीची माहिती दुकानात दर्शनी भागात लावण्यासंदर्भात सूचना द्याव्यात, भेसळी

संदर्भात जनतेला तक्रारी नोंदवण्यासाठी टोल फ्री क्रमांक सुरू करावा, तसंच पोर्टल विकसित करावं असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

**वीरमरण-अहिल्यानगर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील हवालदार रामदास बढे यांना जम्मू काश्मीरमधे तंगधर जिल्ह्यात कर्तव्यबजावत असताना काल वीरमरण प्राप्त झालं. त्यांच्या पार्थिव देहावर संगमनेरतालुक्यात मेंढवण या त्यांच्या मूळ गावी आज दुपारी लष्करी इतमामात अंत्यसंस्कारकेले जाणार आहेत.

**खेलो इंडिया**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत राज्यातल्या खेळाडूंनी आतापर्यंत 14 सुवर्णपदकांसह एकंदर 36 पदकं पटकावली आहेत. यात मैदानी स्पर्धांमधल्या 10 सुवर्णपदकांचा समावेश आहे. भालाफेकमध्ये F तेरा या प्रकारात प्रतीक पाटीलनं कास्यपदक तर कोल्हापूरच्या स्नेहल बेनाडे हिनं महिलांच्या गोळाफेकमध्ये रौप्यपदक जिंकलं. महिलांच्या F 56 प्रकारात मीना पिंगाने हिने थाळीफेक मध्ये तिसरं स्थान मिळवलं. राजश्री कासदेकर हिने भालाफेकमध्ये कास्यपदक प्राप्त केलं.

**पाऊस**

काल रात्री रत्नागिरी जिल्ह्यात अनेक ठिकाणी पावसानं जोरदार हजेरी लावली. रत्नागिरी शहर परिसरातही किरकोळ पाऊस झाला. कोल्हापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला तर पेठ वडगाव परिसरात दोन तास गारांचा पाऊस झाला. सांगली जिल्ह्यात मिरज आणि परिसरात वादळी वारा आणि मेघगर्जनेसह जोरदार पावसाची नोंद झाली. सातारा जिल्ह्यात सातारा आणि जावळी तालुक्यातल्या काही गावांतही काल पावसानं हजेरी लावली.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.